नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 16/06/2021 (बुधवार)
(सायंकाळ)

---

## अवैध देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक 15/06/2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा, ना.ग्रा चे पथक पो. स्टे. भिवापुर हद्दीत उमरेड ते भिसी चिमुर रोडवर पेट्रोलिंग करीत असता अवैध देशी दारू वाहतुकी बाबत मिळालेल्या गुप्त माहिती च्या आधारे सालेभट्टी फाटयाजवळ नाकाबंदी केली असता एमएच–40/एएफ–026 क्रमांकाच्या टाटा सुमो गाडीला थांबवून चेक केले असता सदर वाहनात 70 खोके देशी दारू कि. 2,35,200/–रू. चा माल मिळुन आला आहे. आरोपी नामे– अमर बबनराव सुकारे, वय 22 वर्ष, रा. भिवापुर याच्या ताब्यातुन देशी दारू कि. 23,52,00/–रू. व वाहन कि. 4,00,000/–रू. असा एकुण किंमती 6,35,200/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीविरूद्ध पो. स्टे भिवापुर महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कार्यवाही करून पुढील कार्यवाही करीता पो.स्टे. भिवापुर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस हवालदार श्री. मदन आसतकर, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ)(इ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, पोलीस हवालदार रमेश भोयर, मदन आसतकर, पोलिस शिपाई राधेश्याम कांबळे व चालक साहेबराव बहाळे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर